# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र. 3997/ शि.वि. / 2015
दि. 7/ 05 / 2015

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ. / उच्च प्राथ. / माध्य. शाळा,
म.न.पा., नागपूर.

**विषय – उन्हाळी सुटयांमध्ये शाळा कार्यालय स.8 ते 12 वाजेपर्यंत नियमित सुरू ठेवण्याबाबत.**

**संदर्भ :– कार्यालयीन पत्र क्र. 3751 / शिवि / 2015 दि. 13.02.015.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, ग्रीष्मकालीन सुट्टयांमध्ये शाळा निरीक्षक व मनपा अधिकारी हे शाळेला भेट देणार आहे, याकरीता खालील सूचनांचे पालन करावे.

1) ग्रीष्मकालीन सुट्टयांमध्ये चपराशी व एक शिक्षक कार्यालयात हजर असणे अनिवार्य आहे. याकरीता नियोजन करून शिक्षकांच्या पाळया लावण्यात याव्या.
2) कार्यालय दररोज सकाळी 8.00 ते 12.00 वाजेपर्यंत सुरू राहील.
3) या कालावधीत पटनोंदणीचे कार्य व कार्यालयीन कामकाज दररोज करण्यात यावे.
4) शाळा भेटी दरम्यान कुणी गैरहजर आढळल्यास संबंधित शिक्षक व चपराशीवर कारवाई करण्यात येईल.
5) सुट्टीतील कार्यालयीन उपस्थिती नियोजनाचा तक्ता शाळा निरीक्षक यांच्याकडे सादर करावा.
6) दि. 26.06.2015 रोजी शाळेचा पहिला दिवस असून या दिवशी प्रवेशोत्सव साजरा करावयाचा आहे. याचे नियोजन करून प्रवेशोत्सव कार्यक्रम आनंदी व प्रसन्न वातावरणात पार पडेल याची दक्षता घ्यावी. या निमीत्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्याकरीता शाळा समिती व मा. नगरसेवक यांचा सहभाग घ्यावा. शालेय स्वच्छता व पूर्वतयारी दि. 20.06.2015 पासून सुरू करावी.
7) ग्रीष्मकालीन सुट्टयांमध्ये प्राथमिक विभागातील मुख्याध्यापक व शिक्षकांना मुख्यालय सोडावयाचे असल्यास संबंधित झोनचे शाळा निरीक्षकांकडून परवानगी घ्यावी. माध्यमिक शाळेतील शिक्षकांना मुख्यालय सोडावयाची परवानगी मुख्याध्यापक देतील. तर माध्यमिक शाळा मुख्याध्यापकांनी सहा. शिक्षणाधिकारी यांच्या परवानगीने मुख्यालय सोडावे.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर

PC:2/D:\reshma:/Tembhurne sir \ Letter 1.doc